वाचा:- १) महा.शा.ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन इमारत,मुंबई-०१,यांचेकडील शासन निर्णय क्र. सेवार्थ-२०१४/प्र.क्र.३९/वित्त-५. दिनांक १५ सप्टेंबर २०१५

---

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक.
आरोग्य विभाग,
जाक्र.आरोग्य/आस्था- ५ /१३३०/२०१७
नाशिक , दिनांक- १६ /१०/२०१७

आदेश

ज्याअर्थी, जिल्हा परिषद कर्मचारी यांचे वेतन हे पंचायत राज सेवार्थ प्रणाली मध्ये काढण्यात येते. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन इमारत,मुंबई-०१ यांचे कडील शासन निर्णय क्र. सेवार्थ-२०१४/प्र.क्र.३९/वित्त-५. दिनांक १५ सप्टेंबर २०१५ नुसार आरोग्य विभागातील तालुकास्तरीय वेतन देयका करीता आवश्यक ती माहिती भरण्यासाठी प्राथमिक जबाबदारी आणि प्रमाणित करुन माहिती सादर करणारा अधिकारी म्हणुन वैद्यकिय अधिकारी यांना घोषीत केले आहे. तसेच तालुक्यातील वैद्यकिय अधिकारी यांचेवर नियंत्रण हे तालुका आरोग्य अधिकारी यांचे असते.

ज्याअर्थी, प्रचलीत रितीने गट स्तरावरील आरोग्य कर्मचारी यांचे आस्थापना विषयक कामे हे गट विकास अधिकारी यांचे मार्फत पार पाडली जातात. मात्र प्रत्यक्ष सर्व आरोग्य कर्मचारी हे वैद्यकिय अधिकारी यांचे अखत्यारीत असतात व त्यांचे कामकाजाचा आढावा हा तालुका आरोग्य अधिकारी हे दरमहा घेत असतात. त्यामुळे सर्व आरोग्य कर्मचारी यांचेवर नियंत्रण ही तालुका आरोग्य अधिकारी यांचे असते. त्यामुळे आस्थापना विषयक बाबी या तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडेस सोपविल्यास आरोग्याच्या योजनेविषयक व आस्थापना विषयक कामकाज हे अत्यंत सुलभ प्रकारे पार पाडले जाईल.

त्याअर्थी, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक या आदेशान्वये गट विकास अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे की त्यांनी त्यांचेकडील आरोग्य कर्मचाऱ्यांची जी आस्थापना विषयक कामे आहेत उदा.सेवापुस्तक हताळणी, नोंदी घेणे, रजा मंजूरी, दैनंदिनी , सेवाविषयक लाभाची कामे व इतर संपूर्ण प्रशासकीय बाबी तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडेस हस्तांतरीत करावीत. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रशासकीय कामकाजाकरीता यापुढे तालुका आरोग्य अधिकारी यांना स्वाक्षरीचे अधिकार देण्यात येत आहे. या आदेशानुसार कामकाज करणेकरीता गट विकास अधिकारी यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांना सहकार्य करावे. यापुढे आस्थापना विषय सर्व प्रलंबित बाबींकरीता तालुका आरोग्य अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेशाची तात्काळ अंमल बजावणी करावी.

16/10/17

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रति:- गट विकास अधिकारी , पंचायत समिती ------ (सर्व)
प्रति:- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती ---- (सर्व)
प्रत- माहितीसाठी रवाना

- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प.नाशिक
- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जि.प.नाशिक
- ज्ञापन नस्ती.